# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या २० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.३० एप्रिल, २०१९ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची २० वी बैठक दि.३० एप्रिल, २०१९ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील एस. आय. - प्र-कुलगुरु तथा प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. उबाळे व्ही. पी. | सदस्य |
| ४) | प्राचार्या डॉ. श्रीमती पांडे के. ए. | सदस्या |
| ५) | प्राचार्य डॉ. कदम एम. एस. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. कोकरे एस. आर., संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ८) | प्रा. डॉ. हेगडी आर. एस. | सदस्य |
| ९) | प्रा. डॉ. भोसले आर.बी. | सदस्य |
| १०) | डॉ. कोरे व्ही. जी. | सदस्य |
| ११) | डॉ. पवार एस. के. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. शिंगाडे ए. बी. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १५) | श्री. नवले एस. एस. | सदस्य |
| १६) | श्री. पाटील पी. टी. | सदस्य |
| १७) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| १९) | डॉ. आवताडे एच. के. | सदस्य |
| २०) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २१) | डॉ. काळजे ए. एम. | सदस्य |
| २२) | डॉ. बिराजदार जी. डी. | सदस्य |
| २३) | डॉ. शिंदे टी. व्ही. | सदस्य |
| २४) | डॉ. आदटराव बी. एन. | सदस्य |
| २५) | डॉ. शिंदे एस. के. | सदस्य |
| २६) | डॉ. फुलारी टी. जे. | सदस्य |
| २७) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| २८) | डॉ. मेंते आर. एस. | सदस्य |
| २९) | डॉ. कांबळे जी. एस. | सदस्य |
| ३०) | श्रीमती चव्हाण ए. सी. | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३१) | श्री. साळुंके एस. एस. | सदस्य |
| ३२) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३३) | श्री. शेख ए. एम. | सदस्य |
| ३४) | श्री. गायकवाड एस. एम. | सदस्य |
| ३५) | श्री. सरवदे एस. टी. | सदस्य |
| ३६) | श्री. राणे जी. एफ. | सदस्य |
| ३७) | श्री. गावडे टी. जे. | सदस्य |
| ३८) | श्रीमती मंकणी एन. एस. | सदस्या |
| ३९) | श्रीमती नागणसुरे पी. आर. | सदस्या |
| ४०) | श्री. चव्हाण डी. ए. | सदस्य |
| ४१) | ॲड. कळके ए. एस. | सदस्य |
| ४२) | श्री. डांगरे एम. एस. | सदस्य |
| ४३) | श्री. धरणे जी. आर. | सदस्य |
| ४४) | प्रा. डॉ. देशमुख एम. बी. | सदस्य |
| ४५) | श्रीमती महागांवकर आर. ए. | सदस्या |
| ४६) | श्री. पाटील एस. बी. | सदस्य |
| ४७) | श्री. हिरेमठ एस. बी. | सदस्य |
| ४८) | श्रीमती तडवळकर ए. ए. | सदस्या |
| ४९) | डॉ. चौधरी एस. बी. | सदस्य |
| ५०) | श्री. संगवे ए. बी. | सदस्य |
| ५१) | श्री. गायकवाड एस. जी. | सदस्य |
| ५२) | प्रा. डॉ. घुटे व्ही. बी., कुलसचिव | सदस्य सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

जेष्ठ साहित्यिक व समिक्षक प्रा. डॉ. गो. मा. पवार यांचे दि.१६/०४/२०१९ रोजी निधन झाल्याने व जेष्ठ पर्यावरण तज्ञ सुबेदार बाबूराव पेठकर यांचे दि.२१/०४/२०१९ रोजी निधन झाल्याने अधिसभेच्या बैठकीमध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली.

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच या बैठकीत नव्याने नामनिर्देशित झालेले प्रा. डॉ. एस. आय. पाटील प्र-कुलगुरु, डॉ. एस. आर. कोकरे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रा. डॉ. आर. एस. हेगडी प्र. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य, प्रा. आर. बी. भोसले प्र. संचालक, ज्ञानस्रोत केंद्र, श्री. एस. जी. गायकवाड जिल्हा परिषद सदस्य, सोलापूर व डॉ. व्ही. एस. कोरे संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांची ही पहिलीच बैठक असल्याने मा. कुलगुरुमहोदयांनी त्यांना पुच्छगुच्छ देवून स्वागत केले.

अनुपस्थिती :

अधिसभेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही. यांनी ईमेलद्वारे, श्री. ठाकूर एस. एम. विधानपरिषद सदस्य व डॉ. परिचारक डी. एस., यांनी दूरध्वनीद्वारे व कु. मोहिते-पाटील एस. जे. यांनी पत्राद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. डॉ. माने डी. आर. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे, डॉ. नंदनवार डी. आर. प्र. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी, डॉ. चिट्टे जी. एन., श्री. आवळे ए. के., श्री. अनासपुरे एम. एम., ॲड. सोपल डी. जी. विधानसभा सदस्य व श्री. सर्वगोड एस. ई. पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर हे अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

त्यानंतर कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा. कुलगुरुंना अधिसभेच्या १९ व्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- कुलसचिव कार्यालय:

१) मा. राज्यपाल महोदय यांच्या कार्यालयाकडून दि.२८/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रा. डॉ. शंकर ईश्वरा पाटील हे प्र-कुलगुरु या पदावर दि.०१/०१/२०१९ रोजी प्रस्तुत विद्यापीठामध्ये रूजू झाले आहेत.

२) प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रा. डॉ. श्रीकांत कोकरे दि.१७/१२/२०१८ रोजी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर रुजू झाले आहेत.

३) प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रा. डॉ. विकास भाऊराव घुटे दि.२६/०२/२०१९ रोजी कुलसचिव या पदावर रुजू झाले आहेत.

४) प्रस्तुत विद्यापीठामध्ये संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाकरीता आवेदन मागविण्यात आले.

५) प्रस्तुत विद्यापीठामध्ये संचालक, विद्यार्थी विकास या पदाकरीता डॉ. वसंत गुरुशांत कोरे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

६) श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन “मराठी भाषा गौरव दिन” म्हणून साजरा करण्यात आला.

७) दि.०६/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रान्वये “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ” असे नामविस्तार करण्यात आले. सदर नामविस्तार कार्यक्रम सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

➢ **शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग:**

१) युनियन एज्युकेशन सोसायटीज महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील डॉ. श्रीमती जयश्री शिंदे यांना आंतरराष्ट्रीय परिषद ११ वे विश्व हिंदी सम्मेलन, मॉरीशस येथे उपस्थित राहण्याकरिता विद्यापीठाकडून ₹५०,०००/- आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात आले.

२) दि.०१ मार्च, २०१९ रोजी पासुन सुरु होणाऱ्या कौशल्य विकास केंद्रांतर्गत एक्युप्रेशर प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी श्री. साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल ॲन्ड रिसर्च सोसायटी, नागपूर या संस्थेसोबत शैक्षणिक सहचर्य करार करण्यात आलेला आहे.

३) संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी UPSC, MPSC, Banking Exam, Staff Selection आणि इतर स्पर्धात्मक परीक्षेसाठी करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनाकरिता ₹२,००,०००/- अशी तरतूद असून २७ महाविद्यालयांना काही अंशी आर्थिक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

४) महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांचेकडून प्ा्रप्त झालेल्या बी.व्होक कार्सेसना विद्यापीठाकडून प्रथम संलग्निकरण देण्यात आले आहे.

५) कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयास शै. वर्ष २०१९-२० ते २०२८-२९ या दहा वर्षाकरिता स्वायत्त दर्जा प्राप्त झालेला आहे. तसेच कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर महाविद्यालयास स्वायत्त दर्जा मिळणेकरिता प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केलेला आहे. तर संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळणेकरिता प्राप्त प्रस्तावावर विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

६) शैक्षणिक, संशोधन व विकास विभागांतर्गत पीएच. डी. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या विषयातून ३७ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

७) संशोधन व मान्यता समितीच्या विविध विषयांच्या बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीतील ठरावानुसार अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीने पी. जी. टिचर / पीएच.डी. / एम. फिल मार्गदर्शक म्हणून २४ शिक्षकांना मान्यता देण्यात आली आहे.

➢ **परीक्षा व मूल्यमापन विभाग:**

१) माहे ऑक्टोबर / नोव्हेंबर, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या सर्व परीक्षांचे निकाल व एम. ई. व एम. टेक. अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करुन तसेच पुर्नमूल्यांकनाचे निकाल विहीत वेळेत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

२) प्रस्तुत विद्यापीठाचा १४ दीक्षांत समारंभ दि.१९/०१/२०१९ रोजी झाला. सदर समारंभ प्रमुख पाहुणे मा. प्रा. अनिल सहस्त्रबुध्दे, अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली म्हणून उपस्थित होते व त्यांनी स्नातकांना उद्देशून उच्च शिक्षणाचे विचार मांडले तसेच अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत यशास्वीरित्या संपन्न झाला.

➢ **वित्त व लेखा विभाग:**

१) प्रस्तुत विद्यापीठासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता संवैधानिक लेखापरीक्षण करण्याकरिता सनदी लेखापाल एस. के. व्ही. एम. ॲन्ड कंपनी, सोलापूर (श्री. सचिन भट्टड) यांची व्यवस्थापन परिषदेने शिफारशीनुसार नियुक्ती करण्यात आली.

२) मा. महालेखापाल कार्यालयाकडून महालेखापाल कार्यालयाने केलेल्या दि.२०/११/२०१७ ते ३०/१२/२०१७ या कालावधीत सन २०१५-१६ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणामधील आक्षेपांची पूर्तता अहवाल महालेखाकार कार्यालयाकडे पाठविण्यात आला.

➢ **नॅक / रुसा:**

१) दि.१२ सप्टेंबर, २०१८ रोजी Arm University Program, Bangalore व प्रस्तुत विद्यापीठ यांच्यामध्ये नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमाबरोबर उच्च गुणवत्तेचे विद्यार्थी निर्माण करण्याकरिता सामंजस्य (MoU) करार करण्यात आला.

२) सार्वजनिक अकृषी विद्यापीठे व महाविद्यालये यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांक वाढविण्याच्या कामात सल्ला व सेवा देण्याकरिता Indian Centre for Academic Ranking and Excellence या संस्थेसोबत विद्यापीठाने सामंजस्य (MoU) करार करण्यात आला.

३) दि.२२ ते २४ जानेवारी, २०१९ रोजी Faculty Development Program on Revised NAAC या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

- **ज्ञानस्रोत केंद्र:**

१) दि.२८/११/२०१८ ते ३०/११/२०१८ दरम्यान ज्ञानस्रोत केंद्रांतर्गत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आला.

- **राष्ट्रीय सेवा योजना:**

१) राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत दि.३१ ऑक्टोंबर, २०१८ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्यात आला.

२) दि.२६/१२/२०१८ ते ३०/०१/२०१९ या कालावधीत सोलापूर शहरातील एकुण १६ महाविद्यालये विद्यापीठ ग्राम दत्तक योजनेअंतर्गत दत्तक घेतलेल्या गावालगतची ०६ महाविद्यालये तसेच इतर ३५ महाविद्यालयांची राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीरे राबविण्यात आले.

३) दि.२५ जानेवारी, २०१९ रोजी लोकशाही पंधरवडा निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून सोलापूर शहरातील १० रा. से. यो. एकक असलेल्या महाविद्यालयातील प्रत्येकी ५० स्वयंसेवक / स्वयंसेविका यांना घेऊन मतदार जागृती रॅली काढण्यात आली.

- **विद्यार्थी विकास विभाग:**

१) प्रस्तुत विद्यापीठाच्या विद्यार्थी विभागातर्फे आयोजित पंधराव्या युवा महोत्सवाचे आयोजन दि.२० ते २३ ऑक्टोबर, २०१८ दरम्यान एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव येथे करण्यात आले. या युवा महोत्सवात सर्व साधारण विजेते पदाचा प्रथम क्रमांक श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी, द्वितीय क्रमांक डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर आणि तृतिय क्रमांक संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांनी पटकावला.

२) इंद्रधनुष्य युवा महोत्सव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे दि.०७ ते ११ नोव्हेंबर, २०१८ दरम्यान अयोजित आलेल्या युवा महोत्सवात प्रस्तुत विद्यापीठास सहा पारितोषिके मिळाली आहेत.

३) ३४ व्या पश्चिम विभागीय युवा महोत्सव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि.१९ ते २३ डिसेंबर, २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सवात विद्यापीठास ४ पारितोषिके मिळाली.

४) असोसिएशन ऑफ इंडियन युर्निव्हरसिटीज यांनी आयोजित केलेल्या ३४ वा राष्ट्रीय स्तर युवा महोत्सव चंदीगड विद्यापीठ, चदीगड येथे दि.०१ ते ०५ फेब्रुवारी, २०१९ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सवात प्रस्तुत विद्यापीठास राष्ट्रीय स्तरावर चार पारितोषिके मिळाली.

➢ **क्रीडा विभाग:**

१) अखिल भारतीय विश्वविद्यालय, नवी दिल्ली आणि प्रस्तुत विद्यापीठांतर्गत सन २०१८-१९ पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॅन्डबॉल (मुले) स्पर्धेचे दि.१७ ते २१ डिसेंबर, २०१९ दरम्यान दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे आयोजन करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या हॅन्डबॉल संघाने प्रथम क्रमांक पटकविला आहे.

२) मुंबई विद्यापीठात २२ व्या राज्य क्रीडा महोत्सव, २०१८ हा दि.१३ ते १८ फेब्रुवारी, २०१९ दरम्यान पार पडला. यात प्रस्तुत विद्यापीठाने मार्ग व मैदानी स्पर्धेत एक सुवर्णपदक, एक रौप्यपदक व चार कांस्यपदक तसेच कबड्डी मुले व बास्केट बॉल मुलीं संघाने कांस्यपदक पटकावले.

➢ **संकुले:**

- **संगणकशास्त्र संकुल:**

१) Ministry of Statistics and Programme Implementation, Govt. of India व संख्याशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने Official Statistical System in India या विषयावर दि.२९/०१/२०१९ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी Ministry कडून ₹६६,०००/- इतके अनुदान मिळाले.

२) Cytel Statistical Software and Services Pvt. Ltd., Pune व संख्याशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने Statistics Fest या कार्यशाळेचे दि.१६/०२/२०१९ रोजी आयोजन करण्यात आले.

३) संगणकशास्त्र विभाग, Universidade De Evora, Portugal व University of South Dakota, USA यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ व २२ डिसेंबर, २०१८ रोजी Recent Trands in Image Processing and Pattern Recognition या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

४) Computer Application या विभागातर्फे दि.३१/०१/२०१९ रोजी Dexter Innofest या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये Programming Competition व Paper Presentation चा समावेश होता. या स्पर्धेमध्ये ३०७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

५) राष्ट्रीय गणित दिवस २०१८ निमित्त गणित विभागातर्फे Mega Competition चे दि.०८/०२/२०१९ रोजी आयोजन करण्यात आले.

- **सामाजिकशास्त्र संकुल:-**

१) सामाजिक शास्त्र संकुलातील प्रा. भा. इ. सं. आणि पुरातत्वशास्त्र विभागाने दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजी "कृषी पर्यटन प्रमाणपत्र अभ्यासक्रम" याचे उदघाटन केले आहे.

२) डॉ. माया ज. पाटील, विभाग प्रमुख प्रा. भा. इ. सं. आणि पुरातत्वशास्त्र विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँन्ड रिसर्च इन्स्टिटट्यूट, पुणे यांच्या सहकार्याने RUSA कडून ₹१ कोटी आणि ५ लाख २५ हजार निधी मिळाला आहे.

३) डेक्कन कॉलेज, अभिमत विद्यापीठ, पुणे व प्रस्तुत विद्यापीठ यांच्यामध्ये दि.०१ डिसेंबर, २०१८ रोजी संशोधन व नाविण्यपूर्ण उपक्रम (Research, Innovation & Quality Improvement) करिता सामंजस्य (MoU) करार करण्यात आला.

४) पुरातत्वशास्त्र विभागाने दि.०९ जानेवारी २०१९ ते १९ फेब्रुवारी २०१९ पर्यंत नरखेड ता. मोहोळ जि. सोलापूर येथे डॉ. माया ज. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुरातत्वीय उत्खनन केले.

५) मास कम्युनिकेशन विभागाने पत्रकार दिनाच्या अनुषंगाने दि.०७ ते १२ जानेवारी, २०१९ दरम्यान माध्यम सप्ताह साजरा केला.

६) दि.०५ फेब्रुवारी, २०१९ रोजी मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. आर. बी. चिंचोलकर यांनी "लोकशाही आणि निवडणूका" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

७) मास कम्युनिकेशन विभागाने जिल्हाधिकारी कार्यालय तथा जिल्हा निवडणूक कार्यलय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०८ फेब्रुवारी, २०१९ रोजी पथनाटय आणि शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन केले. त्यातील विजेत्याना ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी पारितोषिके देण्यात आली.

८) दि.०९ डिसेंबर, २०१८ ते २९ डिसेंबर २०१८ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व प्रस्तुत विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रिफ्रेशर कोर्स यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

९) दि.०४ जानेवारी, २०१९ रोजी Untold History of United States & Concept of Nuclear Energy या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले. प्रमुख भाषण डॉ. पीटर कुझनिक यांचे झाले.

१०) दि.०४ व ०५ जानेवारी, २०१९ रोजी विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांकरिता प्रथमच युवास्पंदन सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले.

- **भाषा व वाङ्मय संकुल:**

१) प्रस्तुत विद्यापीठात सप्टेंबर, २०१८ रोजी भाषा व वाङ्मय संकुल सुरु करण्यात आले.

२) प्रस्तुत विद्यापीठाने दि.०१ ते १५ जानेवारी, २०१९ दरम्यान "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.

- **वाणिज्य व व्यवस्थापन संकुल:**

१) दि.०५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाने निवडणूका व सुशासन या विषयावर पोस्टर आणि ग्रिटिंग स्पर्धा आयोजित केली.

- **आरोग्य विज्ञान संकुल:**

१) दि.११/१०/२०१८ रोजी विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या वतीने विद्यापीठ महिला वसतीगृहातील विद्यार्थीनीसाठी "अस्थीघनता तपासणी" शिबीराचे आयोजन करण्यात आले.

२) प्रस्तुत विद्यापीठामध्ये "स्कूल ऑफ अलाईड सायन्सेस" ची स्थापन केलेली असून या अंतर्गत PG. Diploma in Dietetics and Nutirtion हा अभ्यासक्रम जानेवारी २०१९ पासून चालू करण्यात आलेला आहे.

३) प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध पॅरामेडीकल अभ्यासक्रम अद्यावत करुन, नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार केला आहे.

४) विद्यापीठाने एक वर्ष कालावधीचा योग शिक्षक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू केलेला असून सद्यस्थितीत ६० विद्यार्थी हा अभ्यासक्रम शिकत आहेत.

५) प्रस्तुत विद्यापीठाने श्री. साई समर्थ एज्युकेशनल मेडीकल रिसर्च सोसायटी, नागपूर या सस्थेसोबत शैक्षणिक सहचर्य करार करुन सहा महिने कालावधीचा एक्यूप्रेशर प्रमाणपत्र अभ्यासक्रम ०१ मार्च, २०१९ पासून चालू केलेला आहे.

- **भूशास्त्र संकुल:**

१) Innovative Research Activity योजने अंतर्गत "Studies on the use of Constructed Wetland for the treatment of textile effluent" या संशोधनात्मक अभ्यासासाठी ₹२,५०,०००/- इतके अनुदान मंजूर झाले आहे.

२) Seed Money for Research या योजने अंतर्गत Multidiciplinary Research Prolect (Collaborative) entitled "Ujani Water Storage Dam" च्या संशोधनात्मक अभ्यासासाठी ₹२,५०,०००/- इतके अनुदान मंजूर झाले आहे.

- **रसायनशास्त्र संकुल:**

१) रसायनशास्त्र संकुलामधून एकूण ०६ रिसर्च पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नलमधून प्रसिध्द झाले आहेत.

२) रसायनशास्त्र संकुलामार्फत विज्ञान दिवस दि.२८ फेब्रुवारी, २०१९ रोजी विविध स्पर्धेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र क्र. सोविसो / सनिवि / अधिसभा / ९३३६, दि.२५/१०/२०१८ अन्वये, दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२२/११/२०१८ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम क्र.४७६ (८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.

(टिपणी: परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६ (७) अन्वये पाठविण्यात येतील).

ठराव: अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:५० वाजता सुरु झाला व दुपारी ०१:५० वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.३१ ते ३८ त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.
ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र "अ")

**[ ३ ] विद्यापीठाचे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्प व २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत केलेली शिफारशी मान्य करुन सदर अर्थसंकल्प मंजूर करण्यात यावा."

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३ (१) नुसार विद्यापीठाचे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. एम. एम. माने | अध्यक्ष |
| २) | प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे | सदस्या |
| ३) | डॉ. जी. एस. कांबळे | सदस्य |
| ४) | CA श्रेणीक शहा | निमंत्रित सदस्य |
| ५) | डॉ. बी. सी. शेवाळे | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.१५, १६, १७ व दि.१८/०१/२०१८ रोजी सर्व विभाग व संकुलप्रमुख यांचेसमवेत बैठक घेवून अर्थसंकल्पीय मसुद्यावर त्यांचेशी सविस्तर चर्चा केली. तसेच मागील तीन वर्षाची व चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा - खर्च तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीचा आढावा घेवून सदर अर्थसंकल्पीय उपसमितीने सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा तयार करुन वित्त व लेखा समितीच्या दि.०१/०२/२०१९ रोजी झालेल्या सभेसमोर विषय क्र.०३ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला

| ठराव: | सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्प दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |
|---|---|

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.२०/०२/२०१९ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.१४ अन्वये विचारार्थ सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| ठराव: | विद्यापीठाचे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस दुरुस्तीसह शिफारस करण्यात आली. |
|---|---|

सबब, विद्यापीठाचे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस विचारार्थ).

**ठराव:** **डॉ. जी. एस. कांबळे यांनी सन २०१८-१९ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यास डॉ. बी. एम. भांजे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**त्यानंतर सन २०१८-१९ च्या सुधारीत अर्थसंकल्पावर व सन २०१९-२० च्या मूळ अर्थसंकल्पावर मुद्देसूद चर्चा झाली व या अर्थसंकल्पांना दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ४ ] **अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"विद्यापीठाच्या मार्च २०१९ पासून सुरु होणाऱ्या परीक्षा तीन सत्रात होणार असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे. परंतु अनेक वरिष्ठ महाविद्यालयाना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असल्याने या परीक्षा पध्दतीमुळे कनिष्ठ महाविद्यालय परीक्षा कालावधीत बंद करावे लागणार असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. तरी विद्यापीठाने परीक्षा तीन ऐवजी पूर्वीप्रमाणे दोन सत्रात घ्यावात अशी शिफारस अधिसभा परीक्षा व मुल्यमापन मंडळास करित आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. एस. टी. सरवदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ५ ] **अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारले जाणारे शुल्क तसेच विहीत कालावधीत प्रोग्रेस रिपोर्ट सादर न केल्यास, पात्रता वेळेत सादर केलेली नसल्यास आकारला जाणारा दंड अवाजवी असल्याने विद्यार्थ्यांवर अन्याय होतो आहे. त्यामुळे त्यांना आकारले जाणारे शुल्क व दंड योग्य ते आकारले जावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. एस. के. शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ६ ] **अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर जिल्हयात यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने प्रथम सत्रात विद्यार्थ्यांची फी माफ केलेली होती. परंतु द्वितीय सत्रात ती माफ करण्यात आलेली नाही. तरी दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. एम. एस. डांगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ७ ] **अधिसभा सदस्या श्रीमती आर. ए. महागांवकर यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठ संलग्न महाविद्यालय विद्यार्थ्यांना मृत्यूपश्चात विमा संरक्षण आहे परंतू एखादा विद्यार्थी आजारी पडल्यास त्यास कोणत्याही प्रकारची आरोग्य विमा सध्या उपलब्ध नाही. त्यामुळे ज्या अर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची क्षमता नाही अशा विद्यार्थ्यांना आरोग्याच्या विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आरोग्य विम्याचे कवच विद्यापीठाने द्यावे तशी तरतूद करावी अशी शिफारस अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. सी. एस. चव्हाण यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ८ ] **अधिसभा सदस्य डॉ. टी. जे. फुलारी यांच्या वतीने डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी वरिष्ठ पर्यवेक्षक नेमत असताना त्यांच्या नेमणूकीचा कालावधी आठ दिवसांचाच असावा अशी शिफारस ही अधिसभा व परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. एस. के. शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ९ ] **अधिसभा सदस्य श्री. एस. टी. सरवदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये प्रत्येक वर्षी नैसर्गिकरित्या १०% वाढ करण्याचा प्रचलित नियम मागे घेण्याची शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. एम. एस. डांगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ १० ] अधिसभा सदस्य श्री. एस. एम. गायकवाड यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सोलापूर विद्यापीठांत छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने अध्यासन सुरु करण्याचे शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. आर. एस. गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ ११ ] अधिसभा सदस्य डॉ. एस. के. शिंदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सोलापूर विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील नियमित शिक्षकांना पीएच. डी. प्रवेशासाठी १०% जागा राखीव ठेवण्याची शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करीत आहे."

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

वंदेमातरमने मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिवांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| कुलसचिव | मा. कुलगुरु |
| सदस्य सचिव, अधिसभा | अध्यक्ष, अधिसभा |

विषय क्र. ०२ चे सहपत्र

अधिसभेच्या मंगळवार, दि.३० एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. सी. एस. चव्हाण | | डॉ. एच. के. आवताडे |
| १ | ग्रंथालय शास्त्र पीएच. डी. संशोधन केंद्र, सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यात येणार आहे काय? | सध्या प्रस्तावित नाही. |
| | • विद्यापीठ सुरु होवून १४ वर्षे झालेली आहेत, विद्यापीठामध्ये आपण पूर्णपणे ग्रंथालय प्रमुख नेमलेले आहेत काय? | नाही. |
| | • त्याची गरज भासत नाही काय? | गरज आहे, प्रक्रिया चालू आहे. |
| २ | सोलापूर विद्यापीठात भाषाशास्त्र संकुलात पाली व प्राकृत या प्राचीन भारतीय भाषांची पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता सुरुवात केली जाणार आहे काय? | होय. |
| | • सध्या कोणकोणत्या भाषांचा अभ्यासक्रम चालू आहे? | सध्या हिंदी, इंग्लिश, मराठी, ऊर्दू आणि संस्कृत या पाच भाषांचा अभ्यासक्रम चालू आहे. |
| | • अजून कोणकोणत्या भाषा प्रस्तावित आहेत? | यावर्षीपासून पाली आणि कन्नडा या दोन भाषा प्रस्तावित आहेत. |
| ३ | सोलापूर विद्यापीठाने सुरु केलेल्या लोकशाही निवडणुका व सुशासन या आवश्यक पेपर करिता विद्यार्थ्यांना पुस्तके व शिकविणाऱ्या प्राध्यापकांना मानधन देण्याची तरतुद विद्यापीठाने केली आहे काय? | प्रस्तूत विद्यापीठाने सुरु केलेल्या लोकशाही निवडणूका व सुशासन या पेपरसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पेपरसंबंधी सर्वकष माहिती उपलब्ध करुन दिली आहे.<br>सदर पेपर शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी मानधन देण्याची तरतूद करण्यात आली नाही. |
| | • पर्यावरणशास्त्र या आवश्यक पेपरकरिता जर मानधन देण्यात येत असेल आणि विद्यार्थ्यांकडून फी घेतली जात असताना याच विषयाच्या प्राध्यापकावर हा अन्याय का केला जात आहे? | विचार केला जाईल. |
| | • मग तो दूर व्हावा? | दूर केला जाईल. |
| | • महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली जाते? | साधारणपणे २५०/- रुपये घेतले जाताता, पैकी ५० रुपये विद्यापीठाला वर्ग केलं जातात व बाकीचे महाविद्यालयाला राहतात. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| श्री. ए. बी. संगवे | | डॉ. बी. एन. आदटराव |
| ४ | पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया गतवर्षीप्रमाणे यंदाही विद्यापीठामार्फत केंद्रीय पध्दतीने व ऑनलाईनने करण्यात येणार आहे काय? | नाही. |
| | • न करण्याचे कारण काय आहे? | केंद्रिय पध्दतीनं आपण ग्रामीण आणि शहरी या दोन विभागाकरिता ऑनलाईन प्रवेश परीक्षा घेत होतो. परंतु आपल्याला असं जाणवल की इंटरनेटचा अनावश्यक असणारा बोजा जो विद्यार्थ्यांवर पडतोय त्यामूळे विद्यार्थ्यांची सोय होण्याच्या ऐवजी ती गैरसोयीमध्ये वाढ होतेय, असं विद्यापीठाच्या लक्षात आल्याने विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे. |
| | • विद्यापीठामार्फत केंद्रिय पध्दतीने प्रवेश न केल्याने एका विद्यार्थ्यास अनेक महाविद्यालयात अर्ज करावा लागतो, हे विद्यार्थ्याला जास्त खर्चीक आहे, आणि प्रवेशात पारदर्शकता येईल का याचा विद्यापीठाने विचार केला नाही काय? | केला आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या सोयीकरिताच ही यंत्रणा राबविली जाते. |
| | • विद्यार्थ्यांच्या अडचणी काय आहेत आणि त्या सोडविण्याकरिता मागील वर्षी आपण पाहिले आहे की, बीसीयुडी डारेक्टर यांना कोंडण्यापर्यंत प्रकार घडलेला आहे, तर आपण ऑनलाईन पध्दतीने प्रवेश दिल्यास या सगळ्या समस्यावर आपण उत्तर शोधू शकतो असे आपणास वाटत नाही काय? | विचार केला जाईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ५ | मार्च / एप्रिल, २०१९ पासून सर्व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी सत्र परीक्षा पध्दत ही तीन सत्रात म्हणजे सकाळ, दुपार व संध्याकाळ अशा पध्दतीने घेण्यात येणार आहे याचे मानधन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तीन सत्रामध्ये मिळणार आहे काय? | होय. |
| | • परंतू काही पदांना दिवसाला मानधन आहे याचे मानधन वाढवण्याबाबत विद्यापीठाने विचार केला आहे काय? | विचाराधीन आहे. |
| | • आपण तीन सत्रामध्ये परीक्षा घेत आहात तर या तीन सत्रामधी परीक्षा घेण्याची जी पध्दत आहे, त्या पदध्तीमूळे प्राध्यापकांवरती किंवा इतर कर्मचाऱ्यांवरती अतिरीक्त ताण पडतो अस आपणास वाटत नाही का? | होय. |
| | • परीक्षेच काम करणारे Non-Teaching, Teaching यांच मानधन वाढलं पाहिजे या संदर्भात गेल्या सिनेटमध्ये पण आपली चर्चा झाली होती. परंतू अद्याप त्यांच मानधन वाढलेल नाही, त्यासंदर्भात विद्यापीठ काय कार्यवाही करताय? | मानधन वाढीसंदर्भात आपण प्राचार्य डॉ. ए. बी. शिंगाडे यांच्या अध्यतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यांचा अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ६ | सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा हॅण्डबुकमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली होती. त्याचा अहवाल आला आहे काय? | सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा हॅण्डबुकमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी प्रा. डॉ. रजनी दळवी यांच्या अध्यतेखाली समिती नियुक्त केली आहे. त्याचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. |
| | • त्यांना अहवाल देण्यासाठी विशिष्ट मुदत दिली नाही का? दिली नसेल तर पुढील कोणती कार्यवाही केली? | त्यांचा अहवाल हा सदरचे उत्तर सभागृहाला पाठविल्यानंतरच्या काळामध्ये प्राप्त झालेला आहे. |
| | • तो जर प्राप्त झालेला अहवाल असेल तर त्या अहवालावरतीच संबंधित सदस्यांच्या सह्या आहेत का किंवा त्यांच्या मान्यतेने अहवाल पाठविलेला आहे का? | संबंधित अहवाल हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर तो विहीत पध्दतीत न आल्यामूळे तो विद्यापीठाच्या क्रीडा समितीमध्ये ठेवण्यात आला होता. दि.२९/०४/२०१९ च्या बैठकीमध्ये तो अहवाल अपूर्ण अहवाल असल्याने स्विकारलेला नाही. त्यावर नव्याने काम करण्याचे क्रीडा विभागाकडून चालू आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • सदरचा अहवाल कोणत्या कारणाने रद्द केला गेला? | विहीत पध्दतीने तो अहवाल सादर केलेला नव्हता. त्यावर इतर समिती सदस्यांच्या कोणत्याही स्वाक्षऱ्या नसल्या कारणांन तो अपूर्ण अहवाल आहे अस समजून तो आपण रद्द केलेला आहे. |
| | • हा अहवाल विशिष्ट मुदतीत प्राप्त न झाल्यामूळे खेळाडूंच्या विकासाचे निर्णय प्रलंबित राहतील त्याची जाणीव समिती अध्यक्षांना करुन दिली नाही काय? | दिलेली आहे. |
| **कु. एस. जे. मोहिते-पाटील यांच्या वतीने डॉ. टी. व्ही. शिंदे** | | **श्रीमती एन. एस. मंकणी** |
| ७ | सोलापूर विद्यापीठामध्ये संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना काय सोयी व सुविधा दिल्या जातात? | विद्यापीठामध्ये संशोधनासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, एकही आंतरराष्ट्रीय विद्यार्थी प्रवेशित नाही. |
| | • आंतरराष्ट्रीय सुविधा कोणकोणत्या विद्यापीठात आहे? त्या विद्यार्थ्यासाठी अशा कोणत्या सोयी उपलब्ध केलेल्या आहेत? | आजरोजी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी नाहीत. |
| | • आंतरराष्ट्रीय स्तरावरचे विद्यार्थी यासाठी विद्यापीठाने त्यांच्यासाठी काय काय सुविधा विद्यापीठामध्ये उपलब्ध केलेले आहेत? | विद्यापीठामध्ये संशोधनासाठी ज्या काही गोष्टी लागतात त्याच्याकरिता विभाग सज्ज आहे. याच वर्षीपासून आम्ही निर्णय घेतला आहे की, कितीही विद्यार्थी १० पर्यत विद्यार्थी आले तर रिसर्च आणि पोस्ट ग्रॅज्युएशनकरिता ते इथे ॲडमिशन घेवू शकतात. त्याच्यासंदर्भात लॅब व्यवस्था राहण्याच्या सुविधा विद्यापीठात उपलब्ध आहेत. |
| | • आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या विद्यार्थ्यांसाठी निवासाची व्यवस्था आपण नेमकी कोठे केलेली आहे? | आपल्या बॉईज हॉस्टेल आणि गर्लस् हॉस्टेलमध्ये. |
| ८ | सोलापूर विद्यापीठाच्या निर्मितीनंतर किती व कोणकोणते अभ्यासक्रम अनुदानीत तत्वावर सुरु करण्यात आले आहेत? | सोलापूर विद्यापीठाच्या निर्मितीनंतर गणित, संख्याशास्त्र आणि प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्वशास्त्र हे तीन अभ्यासक्रम अनुदानित तत्वावर सुरु करण्यात आले. |
| **डॉ. टी. जे. फुलारी** | | **प्रा. डॉ. जी. एस. कांबळे** |
| ९ | वर्ष २०१७-१८ व वर्ष २०१८-१९ या कालावधीत निवडलेल्या कोणकोणत्या प्राचार्यांना API पूर्ण करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली आहे? | विद्यापीठाने कोणासही प्राचार्य पदासाठी API पूर्ण करण्याच्या अटीवर मान्यता दिलेली नाही. |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१०</td><td>शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या (संचालक, परीक्षक व मूल्यमापन मंडळ, कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी) प्रभारी पदभार कोणा-कोणास दिला? व त्यांची नावे तसेच कालावधी कुठला?</td><td>
<table>
<tr><th>अ क</th><th>संवैधानिक अधिकाऱ्यांचे पदनाम</th><th colspan="2">सन २०१७-१८</th><th colspan="2">सन २०१८-१९</th></tr>
<tr><td rowspan="4">१)</td><td rowspan="4">कुलसचिव</td><td colspan="2">१) श्री. बी. पी. पाटील<br>कालावधी दिनांक</td><td colspan="2">प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे<br>कालावधी दिनांक</td></tr>
<tr><td>१६/१२/१६</td><td>०५/०४/१७</td><td rowspan="3">०९/१०/१८</td><td rowspan="3">२५/०२/१९</td></tr>
<tr><td colspan="2">२) प्रा. डॉ. पी. प्रभाकर<br>कालावधी दिनांक</td></tr>
<tr><td>०६/०४/१७</td><td>०९/१०/१७</td></tr>
<tr><td rowspan="2">२)</td><td rowspan="2">वित्त व लेखाधिकारी</td><td colspan="2" rowspan="2">निरंक</td><td colspan="2">प्रा.डॉ. एस. आय. पाटील<br>कालावधी दिनांक</td></tr>
<tr><td>०१/०२/१९</td><td>आजता गायत</td></tr>
<tr><td rowspan="5">३)</td><td rowspan="5">संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ</td><td colspan="2">श्री. एम. एस. रोकडे<br>कालावधी दिनांक</td><td colspan="2">डॉ. डी. डी. कुलकर्णी<br>कालावधी दिनांक</td></tr>
<tr><td>१९/०८/१७</td><td>२७/०९/१७</td><td>०२/०८/१८</td><td>०३/०९/१८</td></tr>
<tr><td rowspan="3">१०/११/१७</td><td rowspan="3">३१/०१/१८</td><td colspan="2">डॉ. मृणालिनी फडणवीस<br>कालावधी दिनांक</td></tr>
<tr><td>०४/०९/१८</td><td>१६/१२/१८</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td>• शासन निर्णय १५/०३/२०१५ नुसार, अशाप्रकारचे प्रभारी पदभार कोणा- कोणास देता येतात?</td><td>Statutary Officer आणि Professor आणि Registrar यांना देता येतात.</td></tr>
<tr><td>११</td><td>सोलापूर विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवी संदर्भातील प्रवेशापासून पदवी मिळेपर्यंतचे नियम एकत्रिपणे उपलब्ध आहेत काय? या नियमांची यूजीसीच्या रेग्युलेशननुसार वेळोवेळी दुरुस्ती केली जाते का?</td><td>नियम उपलब्ध आहेत.<br>त्यामध्ये वेळोवेळी दुरुस्ती केली जाते.</td></tr>
<tr><td></td><td>• विद्यापीठ वेबसाईटवर अशा प्रकारची नियमावली उपलब्ध आहे?</td><td>आहे.</td></tr>
<tr><td></td><td>• पीएच. डी. पदवी प्रवेश घेतल्यानंतर त्याठिकाणी आमापअशा पध्दतीचा आपण दंड आकारला जातो हे खरे आहे का?</td><td>विद्या परिषदेमध्ये ठराव झाल्याप्रमाणे आपण तो दंड आकारतो.</td></tr>
<tr><td></td><td>• तो दंड हा प्रमाणापेक्षा जास्त आहे असं आपणास वाटत नाही का?</td><td>ते विद्या परिषद ठरवते.</td></tr>
<tr><td colspan="2"><u>डॉ. एस. के. शिंदे</u></td><td><u>श्री. ए. के. आवळे यांच्या वतीने डॉ. बी. पी. रोंगे</u></td></tr>
<tr><td>१२</td><td>सोलापूर विद्यापीठात किती विद्या शाखांवर अधिष्ठाता म्हणून प्राचार्यांचे नामनिर्देशन केले आहे?</td><td>सोलापूर विद्यापीठात कोणत्याही विद्याशाखेवर अधिष्ठाता म्हणून प्राचार्यांचे नामनिर्देशन केलेले नाही.</td></tr>
<tr><td></td><td>• किती प्राचार्यांच ह्या संदर्भात प्रभारी अधिष्ठाता म्हणून नामनिर्देशन केलेलं आहे?</td><td>चार विद्याशाखा आहेत, तर या चारही विद्याशाखांवरती चार प्राचार्यांचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून नेमणूक केलेली आहे.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १३ | वर्ष २०१८-१९ या वर्षात कोणत्या विषयाची पुर्नपरीक्षा घ्यावी लागली? | बी. कॉम भाग २ सत्र ३ विषय कारपोरेट अकौटिंग. |
| | • सदर पुर्नपरीक्षा कोणत्या कारणामूळ घेतली गेली? | परीक्षेच्या गैरप्रकारमूळे ती परीक्षा घ्यावी लागली. |
| | • अशाच पध्दतीने एका सोलापूरातल्या परीक्षा केंद्रावरती चुकीचा पेपर म्हणजे दुसरा पेपर दिला गेला आणि तो पाऊन तासानंतर परत बदलून घेण्यात आला अशा पध्दतीन पुर्नपरीक्षा म्हणजे पुर्नपेपर घेण्यात आला हे खरं आहे का? | नाही. |
| १४ | अक्कलकोटच्या खेडगी महाविद्यालयात परीक्षेतील गैर प्रकाराबाबत काय कारवाई केली? | खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.<br>१) सदर महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र दि.०१ मार्च, २०१९ पासून तीन वर्षासाठी बंद करण्यात आले आहे.<br>२) महाविद्यालयास आर्थिक दंड करण्यात आलेला आहे.<br>३) महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदाची मान्यता काढून घेण्यात आली आहे.<br>४) प्रभारी प्राचार्य व संबंधित कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार फक्त) चा दंड करण्यात आलेला आहे. तसेच त्यांना परीक्षेच्या कामातून कायमस्वरुपी निष्कासीत करण्यात आले आहे.<br>५) FIR दाखल करण्याबाबत कळविलेले आहे. |
| | • FIR दाखल झालेला आहे का? | अद्यापपर्यंत दाखल झालेला नाही. |
| | • ज्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा या परीक्षेच्या गैरव्यवहाराशी संबंध नाही अशा कर्मचाऱ्यांना विद्यापीठात परीक्षेच्या कामासाठी नियुक्ती केली आहे. त्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रवास व दैनंदिन भत्ता नाही असा निर्णय घेणे म्हणजे एकाची चूक दुसऱ्याला शिक्षा असे व्यवस्थापन परिषदेला वाटत नाही काय? | दुरुस्ती करण्यात येत आहे. |
| | • FIR दाखल केलेलं नाही अद्याप त्यासंदर्भात विद्यापीठ कोणती कार्यवाही करणार आहे? | दोन स्मरणपत्र देण्यात आलेले आहेत, यावेळी जर महाविद्यालयाने ॲक्शन घेतली नाही तर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| <u>डॉ. टी. व्ही. शिंदे</u> | | <u>डॉ. बी. पी. रोंगे</u> |
| १५ | सन २०१८-१९ या वर्षात विद्यापीठाने रोप-वाटिका स्थापन केली आहे काय? असल्यास कोणकोणत्या प्रकारची रोपे तयार केली आहेत? रोपांची एकूण संख्या व प्रकार किती? | • होय.<br>• सामानिया, शिरिष, पळस, हिरडा, बांबू, बाभुळ, अल्बीजा, बोर, सावर, पेरु, लीज्युम, ऑस्ट्रोलियन बांभूळ इत्यादी प्रकारची रोपे तयार केली आहेत.<br>• रोपाची एकूण संख्या - ४५,५०० आहे.<br>• बारा प्रकारच्या रोपांची रोपनिर्मिती केली आहे. |
| | • रोपवाटिका तयार करत असताना त्या रोपामध्ये लावलेल्या बियाच्या ठिकाणी सर्व बाभळी बिज उगवल्या होत्या काय? | नाही. |
| | • विद्यापीठाच्या रोपवाटिकेमध्ये आपण या ठिकाणी जी रोपे लावलेली आहेत त्या रोपांमध्ये बाभूळ आणि आस्ट्रोलियन बाभूळ या बाभळींची रोपे आपण कोणत्या रोपवाटिकेतून मागविली किंवा याच्या बिया आपण कोठून मागवल्या? | सविस्तर माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| | • रोपवाटिकेचे प्रमुख कोण आहेत त्यांच नाव काय? | NSS Co-ordinator हे रोपवाटिकेचे प्रमुख आहेत. |
| | • वास्तविक पाहता आपण जे रोपांची नावं वाचून दाखविली आहेत त्याच्यामध्ये आपल्याकडच्या निसर्गातील रोपं जी आहेत चिंच असेल, लिंब असेल, आंबा असेल, अशी जी उंबर असेल, वड असेल, पिंपळ असेल, जी झाडं निसर्गाला पूरक आहेत, पशुपक्षांना पूरक आहेत अशा प्रकारची झाडं लावण्याच्या ऐवजी त्याचे रोपवाटिका तयार करण्याच्या ऐवजी निसर्गास पूरक अशी नसणारी किंवा किंबहूना शोची असणारी झाडं आपण त्याच्यामधी घेतलेली आहेत? | आपण सूचविलेल्या रोपांचा पण रोपवाटिकेमध्ये समावेश करण्याचा विचार केला जाईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १६ | राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक कोण आहेत? त्यांचे निवडीचे निकष काय आहेत? | डॉ. एन. जी. काळदाते, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर हे रासेयो जिल्हा समन्वयक आहेत. त्यांच्या निवडीच्या निकषासाठी- राज्य संपर्क अधिकारी, मुंबई यांचे पत्र क्र.रासेयो २००५ / Coeley / साशि- ५, दि.१२ मार्च, २००५ पहावे. |
| | • जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती केलेली आहे त्यांच NSS च Orentation Refreshar Course झाला आहे का? | ऑफिसमध्ये माहिती उपलब्ध आहे. |
| | • राष्ट्रीय सेवा योजनेचा समन्वयक आहे जो तो पूर्ण वेळ नेमलेला आहे का? | प्रक्रिया सुरु आहे. |
| | • अप्रशिक्षीत व्यक्तीस जिल्हा समन्वयक म्हणून नेमता येत का? | मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शासनाच जे पत्र आहे १२ मार्च, २००५ चं त्यास अनुसरुन नेमावं लागेल. |
| | • एका जिल्हाकरिता विद्यापीठ स्थापित असताना जिल्हा समन्वयकची गरज आहे का? | गरज आहे, शासनाच परिपत्रक आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेलं आहे. |
| | • २००५ च्या नियमानुसार किती एरीया Co-ordinator किती आहेत? | ७ एरीया Co-ordinator ची नेमणूक करण्यात आलेली आहे. |
| | • त्यांची नावे काय? | पाहावे लागेल, कार्यालयात उपलब्ध करुन दिले जाईल. |
| १७ | प्रमाद समितीने दंड केलेले कोणकोणते शिक्षक विविध अधिकारी मंडळावर आहेत? | याबाबतची सविस्तर माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| | • प्रमाद समितीने दंड केलेल्या कोणकोणत्या व्यक्तींनी दंड भरलेला नाही आणि त्यावर कार्यवाही काय घडली? | अशा शिक्षकांना स्मरणपत्र पाठविण्यात आलेले आहेत. |
| <u>श्री. आर. एस. गायकवाड</u> | | <u>कु. ए. सी. चव्हाण</u> |
| १८ | सोलापूर विद्यापीठात वर्ष २०१८-१९ या कालावधीत कोणकाणेत्या संकुलामार्फत “युवा स्पंदन” हा कार्यक्रम घेण्यात आला? घेतला असल्यास त्यावर एकूण खर्च किती झाला? | युवा स्पंदन हा कार्यक्रम विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात सर्व संकुलातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या महोत्सवास रु.१,०८,१४८/- इतका खर्च झाला आहे. |
| | • सर्व संकुलामधील किती विद्यार्थ्यांनी या युवा स्पंदन स्पर्धेमध्ये भाग घेतला होता? | अंदाजे ४०० विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला होता. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १९ | महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थ्यांचा अपघात विमा उतरवला जातो काय? असल्यास अपघात विमा हफ्त्याची रक्कम किती आहे? | होय.<br>विमा हप्ताची रक्कम ही प्रती कर्मचारी ₹५९/- आणि प्रती विद्यार्थी व त्यांचे एक कमावते पालक यांना रक्कम ₹६०/- अशी आहे. |
| | • आतापर्यंत किती विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना या विम्याचा फायदा झाला? | ऑफिसमध्ये माहिती उपलब्ध आहे. |
| | • या विम्याबाबत जी मिळणारी रक्कम आहे ती रक्कम किती आहे? | १० लाख. |
| | • एखादा अवयव गेल्यानंतर बाद निकामी झाल्यानंतर किती रक्कमेच तरतूद आहे? | ५ लाख. |
| | • २०१८-१९ या वर्षाच्या कालावधीमध्ये किती विद्यार्थ्यांनी हा विमा उतरविलेला आहे? | ६१,६४६ विद्यार्थ्यांनी विमा उतरविलेला आहे. |
| <u>श्री. टी. जे. गावडे</u> | | <u>डॉ. एच. के. आवताडे</u> |
| २० | सोलापूर विद्यापीठात कोणकोणते प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केले आहेत? असल्यास ते अनुदानित आहेत काय? | कौशल्य विकास केंद्रामध्ये एकूण ६६ विविध कौशल्य विकास अभ्यासक्रम चालविले जातात. त्यापैकी ६३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम व ३ पदविका अभ्यासक्रम आहेत. हे सर्व अभ्यासक्रम विनाअनुदानित आहेत. |
| २१ | वर्ष २०१८-१९ या वर्षात प्रमाद समितीने किती विद्यार्थ्यांना व शिक्षकांना दंड केला आहे? ज्या शिक्षकांना दंड झाला त्यावर काय कारवाई केली? | ०२ विद्यार्थ्यांना व २७ शिक्षकांना दंड केला आहे. |
| | • ज्या शिक्षकांना दंड केला आहे त्या शिक्षकांना पुन्हा परीक्षा विभागाशी कामे दिली आहेत काय? | प्रश्नच येत नाही. |
| | • दंड केलेले जे पत्र आहे ते शिक्षकाला पाठविलेल आहे का? | हो. |
| | • दंड भरलेला वसूल झालेला आहे का पूर्ण? | काही जणांचा वसूल झालाय काही जणांच वसूल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| | • ०२ विद्यार्थी हे सत्य आकडा आहे का? | लॅपसेसच्या मिटिंग सध्या चालू आहेत पुढच्या मिटिंगच्या वेळेला कदाचित वेगळा फिगर येवू शकतो. सध्या जो आकडा दिलेला आहे तो बरोबर आहे. |
| | • दंड याचा अर्थ आर्थिक का परीक्षा बसू दिलं जाणार नाही? | आर्थिक. |
| | • एखाद्या विद्यार्थ्याला त्या विषयावर नापास करणं हा दंड होवू शकतो का नाही? | प्रमाद समितीच्या नियमावलीचा भाग असल्यामूळे त्याला काय म्हणायचं हे स्पष्ट म्हणजे दंड म्हणायचं का शिक्षा म्हणायची हे इथं सांगता येणार नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • लॅपसेस कमिटिच्या प्रमुख आणि सदस्य यांच्यावरती अधिकारमंडळातल्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांकडून दबाव आणला जातो हे माहिती आहे ही खरी आहे का? | माहिती उपलब्ध नाही. |
| **श्री. ए. एम. शेख** | | **श्रीमती एन. एस. मंकणी** |
| २२ | सोलापूर विद्यापीठाचे वाहन कोणकोणत्या अधिकाऱ्यांना वापरता येते? | कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी आणि संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या संवैधानिक अधिकाऱ्यांना विद्यापीठाचे वाहन वापरता येते. |
| | • संचालक, शारिरीक शिक्षण व क्रीडा हे संवैधानिक अधिकारी नाहीत का? | आहेत. |
| २३ | सोलापूर विद्यापीठाची यापूर्वीची PET - ६ कधी घेण्यात आली व यापुढे PET - ७ परीक्षा कधी घेण्यात येणार आहे? | सोलापूर विद्यापीठाची PET - ६ ची परीक्षा जुलै, २०१५ मध्ये घेण्यात आली होती.<br>PET - ७ ची परीक्षा १४ आणि १५ जून, २०१९ मध्ये घेण्यात येणार आहे. |
| | • २०१५ ते २०१९ या कालावधीमध्ये परीक्षा का घेण्यात आल्या नाहीत? | विद्यापीठाने वेळोवेळी परीक्षा घ्यायचा प्रयत्न केलाला आहे अस रेकॉर्डवरुन दिसताय, पण काही कारणामुळ परीक्षा घेता आलेलं नाही. जे विद्यार्थी राहिलेले आहेत २०१५ ते २०१९ मध्ये ते आता परीक्षेला बसतील आणि १४ आणि १५ जूनला ते परीक्षा देतील. |
| | • त्यांच्या या कालावधीमध्ये झालेल्या नुकसानिस कोण जबाबदार आहे? | पीएच. डी. परीक्षेच टाईमटेबल बदल होवू शकतो, विद्यार्थ्याला पीएच. डी. हा एकमेव सोलापूर विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ नाही, अनेक वेगवेगळ्या विद्यापीठाच्या परीक्षा देत असतात, यातून आपण प्रयत्न केलेला आहे, आणि परीक्षा आपली आता १४-१५ जूनला होणार आहे. |
| **श्री. एस. एम. गायकवाड** | | **डॉ. बी. एन. आदटराव** |
| २४ | सोलापूर विद्यापीठात कृषि पर्यटन केंद्र चालू करण्याचा उद्देश काय आहे? | सोलापूर जिल्हा हा कृषी प्रधान आहे. सोलापूर आणि जवळपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कृषी अधारित रोजगार मिळवून देण्यासाठी कृषी पर्यटन केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. |
| | • रोजगार मिळविण्याच्या संदर्भामध्ये २०१९-२० या वर्षाच्या कालावधीमध्ये आपण किती विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देणार आहात? | वर्ग होतात रेग्यूलर, ६ महिन्याचा कोर्स चालू आहे. त्याच्यामध्ये साधारणपणे १८ मूलांनी ॲडमिशन घेतली आहे आणि त्याच्यातले ५ लोक स्वत: शेतकरी आहेत म्हणून ते आपल्या शेतीमध्ये सगळा प्रयोग करणार आहेत. त्याकरिता त्यांनी स्पेशल ॲडमिशन घेतली आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • सोलापूर विद्यापीठाच्या कृषि पर्यटन केंद्रामध्ये कोणकोणती पिकं आणि कोणकोणती शेतीच्या दृष्टिकोणातून वृक्षलागवड केलेली आहे? | एकूण ७ एकर कृषि पर्यटनचा भाग आहे. त्याच्यामध्ये ५ एकरमध्ये जवळपास पूर्ण तयारी झालेली आहे. त्याच्यामध्ये जी विशिष्ट अशी जस आपण म्हणतो ऑक्सिजन पार त्यासंबंधी झाडं लावलेली आहेत. त्यानंतर न्यूरलचा भाग केलेला आहे. न्यूरलचा अर्थ की वेगवेगळी प्रकारची फुलं त्याच्यामध्ये कला संपत्तीचा त्याचा एक भाग केलेला आहे. दुसरा जो आहे नक्षत्र वनाचा आहे. नक्षत्रवनाच्या दोन भाग त्याच्यामध्ये केलेले आहेत. म्हणून त्या संबंधी तुम्हाला नक्षत्र वन याच्या संकल्पना माहित असतील तर जशी भारदार झाडं लागतात तशी ती वड वगैरे त्या पध्दतीने त्याच चलन करुनच तीथं लावलेलं आहे. |
| | • आपल्या कृषि पर्यटन केंद्राच्या ठिकाणी वन्य प्राण्यांचा त्रास होतोय का? | होतोय. |
| | • या कृषि पर्यटन सुरु करण्याच्या धोरणामध्ये आपण अशा प्रकारच्या कोणत्या पर्यटन केंद्राचा आधार घेतला आहे का? | कृषि पर्यटन केंद्राची जी आमची टिम आहे त्यांनी अनेक ठिकाणी पाहिलेलं आहे आणि त्यांच्यातन आपल्याकडे काय पॉसिबल आहे ते आपण केलेलं आहे. |
| २५ | वर्ष २०१८-१९ या कालावधीत विद्यापीठांतर्गत कर्मचाऱ्यांच्या किती व कोणकोणत्या बदल्या झाल्या आहेत? | एकूण ४९ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत.<br>यादी कार्यालयात उपलब्ध आहे. |
| | • या बदल्या करत असताना ज्या कायद्याचा आधार आहे त्या कायद्याचा आधार घेतलेला आहे काय? | होय. |
| | • बदल्या करताना विशिष्ट लोकांचेच ऐकले जाते हे खरं आहे काय? | नाही. |
| २६ | वर्ष २०१९-२० या कालावधीत विद्यापीठामार्फत अश्वमेध स्पर्धेचे आयोजन जाणार आहे काय? असल्यास त्यासाठीच्या तयारीस सुरुवात झाली आहे का? | नाही. |
| | • या क्रीडा महोत्सवात ५ खेळ असतात यात आणखी एक खेळाचा यजमान विद्यापीठ समावेश करतो, या खेळाचा विद्यापीठ समावेश करणार आहे काय? करणार असल्यास कोणत्या खेळाचा समावेश करणार आहे? | होय, हॅण्डबॉल. |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td></td><td>• क्रीडा महोत्सवाच्या आयोजन करण्यासाठी आपण मैदानाची पुरेपूर उपलब्धता केलेली आहे काय?</td><td>होय.</td></tr>
<tr><td colspan="2"><u>श्री. एस. टी. सरवदे</u></td><td><u>डॉ. बी. पी. रोंगे</u></td></tr>
<tr><td>२७</td><td>सोलापूर विद्यापीठांत संशोधक विद्यार्थ्यांकडून कोणकोणत्या कारणांसाठी दंड वसूल केला जातो? त्याचे नियम काय आहेत?</td><td>विद्यापीठाचे शुल्क व प्रोग्रेस रिपोर्ट विहीत कालावधीत विद्यापीठात जमा न केल्यास दंड वसूल केला जातो.</td></tr>
<tr><td rowspan="4">२८</td><td>सोलापूर विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ठरविलेल्या वेळेत सुरु झाला होता काय?</td><td>होय.</td></tr>
<tr><td>• १५ मिनिट अगोदरच चालू झाला?</td><td>नाही.</td></tr>
<tr><td>• या दीक्षांत समारंभाच्या कार्यक्रमास प्रथेप्रमाणे औपचारिक अशा पध्दतीन अधिसभा, व्यवस्थापन परिषद सदस्य व इतर अधिकार मंडळाचे सदस्य यांचा आलेल्या प्रमुख अतिथीच्या समवेत त्या ठिकाणी अनौपचारिक अशा पध्दतीने जी बैठक आहे ती झालेली आहे काय?</td><td>झाली होती.</td></tr>
<tr><td>• प्रथेप्रमाणे या शैक्षणिक वर्षामध्ये दीक्षांत समारंभाच्या कार्यक्रमाध्ये ॲकडेमिक कौन्सिलच्या मेंमबरना स्टेजवर बसविण्यात आलं नाही याच कारण काय?</td><td>प्रश्न पुढे आहे त्यावेळेस उत्तर देण्यात येईल.</td></tr>
<tr><td rowspan="2">२९</td><td>सोलापूर विद्यापीठाने जॉब फेअरचे आयोजन करण्यासाठी कोणकोणत्या कंपनीकडून निविदा मागविल्या आहेत? त्यांची नांवे स्पष्ट करावी तसेच जॉब फेअर आयोजनासाठी कोणत्या कंपनीची निवड करण्यात आली?</td><td>सोलापूर विद्यापीठाच्या कॅम्पस मध्ये जॉब फेयर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी ई-निविदाद्वारे खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of Company</th></tr>
<tr><td>1)</td><td>ENTICE TECH MEDIA PVT. LTD</td></tr>
<tr><td>2)</td><td>OLYMPIS JOB SHOWCASE INDIA PVT. LTD</td></tr>
<tr><td>3)</td><td>SPEED TECH SERVE PVT. LTD (OPC)</td></tr>
</table>
जॉब फेयरसाठी कोणत्याही कंपनीची निवड करण्यात आलेली नाही.</td></tr>
<tr><td>• त्याचं कारण काय?</td><td>त्यांनी जी मागणी केली होती, ती खूप जास्त होती MC मेंमबरर्सबरोबर चर्चा झाली तो रेट कमी करण्याचा प्रयत्न केला, तो होई शकला नाही म्हणून आपण रद्द केला.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • यामध्ये खाडाखोड झाले आहेत, एकाच अक्षराने तीनही निविदामध्ये बदल केलेला आहे हे खरं आहे काय? | नाही. |
| **डॉ. जी. डी. बिराजदार** | | **कु. ए. सी. चव्हाण** |
| ३० | सोलापूर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभास कार्यक्रमात विद्यापरिषदेच्या सर्व सदस्यांना व्यासपीठावर स्थानापन्न का केले नाही? | दिनांक १६/०१/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विषय क्र.११(८) अन्वये झालेल्या ठरावानुसार बैठक व्यवस्था ठरवण्यात आली. |
| | • हा बदल अचानक का करण्यात आला? | एकूनच गोल्ड मेडल आणि पीएच. डी. विद्यार्थ्यांची संख्या आणि अधिसभा, व्यवस्थापन परिषद, डीन ची आणि एकूण व्यासपीठावरील अपेक्षीत असणाऱ्यांची संख्या ही इतकी मोठी होती की तिथे फिरता येणं अशक्य होत, या बदलासाठी आपण व्यवस्थापन परिषदेला विनंती केली होती आणि त्याप्रमाणे ती त्यांनी मान्य केली. |

सही/-

**(सचिव अधिसभा)**

कुलसचिव